# सेवक वार्ता

**सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र**

**नोव्हेंबर-२०२१** **वर्ष -३, अंक-१**

**कार्यालय -** संत एकनाथनगर, भाग-१ 'यशोपर्व', एनव्हीजन कौंप्युटर ट्रेनिंग सेंटर , बिबवेवाडी,, पुणे - ४११०३७


## कन्हारगाव अभयारण्य आराखडा अपडेट ……

कन्हारगाव वन्यजीव अभयारण्याचा व्यवस्थापन पहिला आराखडा करण्यासाठी सेवक संघाने गठीत केलेला चमूने कन्हारगाव येथे दि.१७-११-२१ रोजी क्षेत्रीय दौरा केला. सदरच्या चमूमध्ये सर्वश्री अजय पिलारीसेट, संजय जगताप, संभाजी गवळी, प्रदिप कुलकर्णी, शांताराम कुंभकर्ण, विजय खनके, व डी.जी. कुंदोजवार यांचा समावेश होता. दौऱ्याचा कालावधी १५ ते २० नोव्हेंबर असा निश्चित करण्यात आला होता. चंद्रपूर येथे मुक्कामी राहून प्रारुप आराखड्यास अंतिम रूप दिले व त्याबाबत दि. १८-११-२०२१ रोजी सर्वश्री एन. आर. प्रवीण, मुवसं (प्रा) चंद्रपूर, जी. के. अनारसे, प्रादेशिक व्यवस्थापक, एफडीसीएम, चंद्रपूर, व अरविंद मुंडे, उवसं, मध्य चांदा या स्थानिक वरिष्ठ वनाधिकाऱ्यांना सादरीकरण केले.





## कन्हारगाव अभयारण्य आराखडा बाह्य तज्ञांचा सहयोग….

कन्हारगाव वन्यजीव अभयारण्याचा व्यवस्थापन आराखडा तयार करणेकामी सेवक सदस्य व विविध बाह्य तज्ञांचे सहयोगाने वनस्पती, वन्यप्राणी, पक्षी,फुलपाखरे, किटक इ. क्षेत्रीय सर्वेक्षण यशस्वी रित्या पूर्ण करणेत आले आहे. त्यात डॉ. उमाकांत देशमुख, अभय उजागरे, वडतकर यांचा समावेश होता.

----------oooo-------------------

## कॅम्पा अंतर्गत रोपवनांचे मुल्यांकन काम पूर्ण …..

शिल्लक ४७ कामांचे मूल्यांकन काम दसरा ते दिवाळी या दरम्यानच्या कालावधीमध्ये पूर्ण केले. ही कामे ठाणे, धुळे, पुणे, अमरावती, यवतमाळ,नागपूर या वनवृत्तामध्ये असून त्यांचे एकूण क्षेत्र ६१९ हेक्टर आहे. त्याचा अहवाल तयार करून सादर करण्यात येईल. सदरच्या मुल्यांकन कामासाठी ९ सेवक सदस्यांची चमू बनवण्यात आली ज्यात सर्वश्री एस. के.गवळी, पी. के. कुलकर्णी, आर. टी. मोरे, उमेश धोपेश्वरकर, बी.व्ही.सेलुकर, टि. आर. नंदेश्वर, के.ओ.सेमस्कर जी. एस. खांडेकर व मधुकर पाटोळे यांचा समावेश होत . श्री. विठ्ठल पत्की यांचे मार्गदर्शनाखाली व नियोजनुसार हे काम पूर्ण केले आहे.

## कार्यकारी मंडळ बैठक वृत

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या दि.९-११-२०२१ रोजीच्या आभासी बैठक झाली नाही.सबब वृत्तांकन नाही.

या अंकात . . . . .


१. कन्हारगाव अभयारण्याचा आराखडा….१
२. कॅम्पा निधी अंतर्गत रोपवनाचे ………..१
मूल्यांकन काम
३. सेवक संघ नोंदणीकृत कार्यालय बदलले..१
४. सेवक विशेषांक संबंधात बैठक ………..१
५. सेवक संघ,उपविधीची ओळख …………२
६. सेवक संघ विशेष वृत्त .. … …. …………२
७. निधन वार्ता … ….. ……… २


## सेवक संघ महाराष्ट्रचे नोंदणीकृत कार्यालयात बदल झाला असून तात्पुरता पत्ता -

वि. त्र्यं.पत्की, (दूर.९८२२६७८६४९)
संत एकनाथनगर, भाग-१
'यशोपर्व', एनव्हीजन कौंप्युटर ट्रेनिंग सेंटर , बिबवेवाडी, पुणे-४११०३७

-------------------------------

## सेवक विशेषांक संबंधात बैठक

सेवकचे पुढील सदस्य यांची बैठक श्री. वि. त्र्यं.पत्की, निवासस्थानी दि.१२ /१२/२०२१ रोजी दुपारी ४ वा आयोजीत केली आहे.

१) श्री. शिरीष अस्थाना
२) श्री. मदन कुलकर्णी
३) श्री. अरविंद आपटे
४) श्री. पी बी धानके
५) श्री. उमेश धोपेश्वरकर
६) श्री. विवेक डावरे
७) श्री. बिलास बर्डेकर
८) प्रिंटरचा प्रतिनिधी

विषय सूची-
१)अंकाची रचना ठरविणे
२)मुख व मल पृष्ठ निवड
३)जाहीराती व वर्गणी आढावा
४)कार्यक्रमाचे स्थळ दिनांक वेळ तपशील ठरविणे

५)अंकाची संख्या, मूल्य, वितरण प्रणाली वगैरे
६)प्रिंटरची निवड खर्च इत्यादी
बैठकीच्या स्थळाचा लोकेशन नकाशा लवकरच पाठविला जाईल
******************************

## सेवक संघ विशेष वृत्त.

### "हवामान बदल" या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सेवक संघ सदस्यांची निवड

अमेरिकन कॉन्सुलेट जनरल,मुंबई यांच्यामार्फत "हवामान बदल" विषयावर इंग्रजी भाषेतून १०आठवडे साठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून त्यात Climate Reality Project - India यांचे शिफारशीवरून एकूण २४ प्रशिक्षणांर्थ्यांमध्ये सेवक संघ सदस्य श्री. एस. के. गवळी व श्री. जी. पी.गरड यांची निवड करण्यात आलेली आहे.हे ऑनलाईन प्रशिक्षण दर शनिवारी दोन तास असेल व त्याचा कालावधी १० आठवडे आहे. त्या प्रशिक्षणाचा दृष्टिक्षेप हवामान बदल या विषयाशी संबंधित लेखन कौशल्ये,सार्वजनिक वक्तृत्वकला, सादरीकरण व संज्ञापन कौशल्ये यावर असेल. या प्रशिक्षणाचे उद्दिष्ट प्रशिक्षणांर्थ्यांमध्ये नेतृत्व कौशल्य विकास, वैयक्तिक आत्मविकासाचे दृढीकरण,आणि सार्वजनिक वक्तृत्व सुधारणा करणे असून की ज्याव्दारे हवामान बदल विषयी चर्चा सत्रात सहभागी त्या विषयाचे प्रवक्ते असतील .



सेवक संघ चमूने ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात येणाऱ्या पळसगाव येथील बांबू कोळसा प्रकल्प घटकास भेट दिली.

## सेवक संघ,उपविधीची ओळख

### सेवक संघ, महाराष्ट्राचा सुधारीत उपविधी (भाग - ७)

१५) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरणे बाबत:
१५.१) कार्यकारी मंडळातील रिक्त जागा उपविधी दहामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यकारी मंडळ नेमणूक करून घेईल.
१५.२) रिक्त पदावर निवडलेल्या सभासदाची मुदत कार्यकारी मंडळाच्या मुदती इतकी राहील.
१६.२) कार्यकारी मंडळाचे कार्य पुढीलप्रमाणे राहील.
१६.२.१,२,३.४,५,६) १.संघाचे दैनंदिन व्यवहार पाहणे.
२.संघाचे जमाखर्च ठेवणे.
३.संघाच्या मालमत्तेची देखरेख ठेवणे.
४. संघाच्या सभासदत्वासाठी आलेल्या अर्जाचा विचार करून स्वीकारणे अथवा नाकारणे.
५. संघाचे वार्षिक अंदाजपत्रक, धोरण, कार्यक्रम ठरविणे.

## निधन वार्ता

*श्री. एस.पी. नरवणे सेनि मुख्य वन संरक्षक, पुणे यांचे दि. १८-११-२०११ रोजी वयोमानानुसार दु:खद निधन झाले . त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली

* श्री. व्ही. डी. जाधव, सेनि विभागीय वनाधिकारी यांचे २५-११-२०२१ रोजी त्याच्या गांवी पोसेवाडी येथे दुःखद निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली !

-----------------------------------



दिनांक २०/११/२१ रोजी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प येथे शासकीय कर्तव्यावर असताना सौ. स्वाती ढुमने व वनमजुर यांचेवर माया नामक वाघिनीने अचानक हल्ला केला त्यात दुर्दैवाने सौ. ढुमने यांचा मृत्यू झाला.त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. सौ. ढुमने यांचे कोलारा गेटजवळ झालेल्या मृत्युचे वृत्त वाचून धक्काच बसला. कारण सेवक संघ चमू दिनांक १९/११/२१ रोजी रात्री त्या गेटवरून बांबू नैसर्गिक उगवण वनक्षेत्राची पाहणी करून चंद्रपूर येथे परतला होता. अन् सकाळी ही वाईट बातमी आली. त्या दुर्घटनेची वेळ लक्षात घेता त्यांची आपल्या कर्तव्याप्रती निष्ठा अधोरेखित होते. ताडोबाच्या यशोगाथेत अशा सेवानिष्ठ वन कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. या घटनेमुळे आम्ही दु:खी झालो असून सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ महाराष्ट्र चमू त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत आहे.

कै. स्वाती ढुमणे यांच्या पश्चात त्यांची तीन वर्षाची मुलगी व पती आहेत. ज्या कोणास कै. ढुमणे यांचे कुटुंबियांस आर्थिक मदत द्यावयाची असेल, त्यांनी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प फाउंडेशन खाते क्रमांक ३०७१४७३३४५६, स्टेट बँक ऑफ इंडिया, शास्त्रीनगर शाखा,चंद्रपूर(IFSC SBIN०००१९४१) येथे ऑनलाइन पद्धतीने मदत रक्कम जमा करण्यास कळविले आहे.तसेच सदरचा मदतनिधी कै. स्वाती डोणे यांच्या मुलीच्या नावे कायम ठेव किंवा आर्थिक नियोजित ठेव जाईल, नमूद केले आहे.

-----------------------------------

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे
संपादन - एस. के. गवळी